# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**दाखल झालेले अपील**

## क्र. मुमाआ/अ.क्र.५९५२-६०५३/२६/०१

**श्री. यशवंत भास्कर कदम**
रूम नं. 1 चाळ, पाटकर कंपाऊंड,
तुळशेतपाडा, गावदेवी रोड, भांडुप (प),
मुंबई-400078

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (परि) जी/दक्षिण**
सहाय्यक अभियंता (परिरक्षण) यांचे कार्यालय जी/दक्षिण विभाग,
1ला मजला, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई- 400 013

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
जी/दक्षिण विभाग कार्यकारी अभियंता जी / दक्षिण विभाग कार्यालय,
1ला मजला, ना. म. जोशी मार्ग, धनमिल नाका, मुंबई- 400013.

**जन माहिती अधिकारी तथा, सहा. अभियंता (परि.-2) एम-पूर्व विभाग,**
2 रा मजला, एम/पूर्व विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,
म. तु. कदम मार्ग, दुर्गादेवी चौक, गोवंडी (प), मुंबई - 400043.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता 2 रा मजला,**
एम/पूर्व विभाग कार्यालय, बृहन्मुंबई महानगरपालिका,
म. तु. कदम मार्ग, दुर्गादेवी चौक, गोवंडी (प), मुंबई - 400043.

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.)**
आर/ दक्षिण विभाग कार्यालय दुसरा मजला. स.व.प. तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी काट रस्ता क्र.2 कांदिवली (प) मंबई-67.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**
आर/दक्षिण कार्यालय दुसरा मजला. स.व.प. तरण तलावाजवळ,
महात्मा गांधी काट रस्ता क्र.2 कांदिवली (प) मंबई-67.

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.)**
एफ/उत्तर, विभाग, दुसरा मजला. 96, भाऊ दाजी भार्ग,
माटुंगा (पूर्व) मुंबई 400019.

**प्रथम अपिलीय अधिकारी विभागीय कार्यकारी अभियंता**
(एफ/उत्तर) विभाग २ रा मजला, ९६ भाऊ दाजी रोड,
माटुंगा (पूर्व), मुंबई- ४०० ०१९.

**जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परिरक्षण-१),**
आर/मध्य आयुक्त यांचे विभाग कार्यालय, १ ला मजला,
एफ पी.नं.४४,टी.पी.एस. १,चंदावरकर लेन, बोरिवली (प),
मुंबई-४०० ०९२.

**प्रथम अपिलीय अधिकारी विभाग कार्यकारी अभियंता,**
आर/मध्य विभाग कार्यालय, पहिला मजला, एफ.पी.नं.४४,
टी.पी.एस.१, चंदावरकर रोड, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०० ०९२
**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता जलकामे (बांधकामे) शहर,**
यांचे कार्यालय, इंजिनिअरींग हब बिल्डिंग, पहिला मजला,
डॉ.ई. मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८.
**प्रथम अपिलीय अधिकारी कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे) शहर,**
यांचे कार्यालय, इजिनिअरींग हब इमारत, पहिला मजला, डॉ. ई मोझेस रोड,
वरळी, मुंबई 400018.
**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता जलकामे (बांधकामे)**
पश्चिम उपनगरे सी.टी.एस क्र. ३०९ / ५, मौजे पहाडी, सी-विंग,
सद्भाव एक्सेल इस्टेट सोसायटी, पटेल पेट्रोल पंपासमोर, गोविंदजी श्रॉफ रोड,
एस.व्ही. रोड जवळ, गोरेगाव (प), मुंबई-४००१०४.
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जलकामे (बांधकामे)**
पश्चिम उपनगरे सी.टी.एस क्र. ३०९ / ५, भौजे पहाडी, पहिला मजला, सी-विंग,
सदभाव एक्सेल इस्टेट सोसायटी, पटेल पेट्रोल पंपासमोर, गोविंदजी श्रॉफ रोड,
एस.व्ही. रोड जवळ, गोरेगाव (प), मुंबई - ४००१०४.
**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) ई विभाग**
यांचे कार्यालय, कमर को. ऑप. हौ. सो., 1ला मजला,
पठे बापूराव मार्ग, ग्रॅन्ट रोड (पूर्व), मुंबई- 400 007
**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (रस्ते) शहर-२**
यांचे कार्यालय, कमर सहकारी गृहनिर्माण संस्था, 1 मजला,
नवजीवन सोसायटीसमोर, पठठे बापूराव मार्ग, ग्रॅन्ट रोड (पूर्व), मुंबई - 400007.
**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता (रस्ते) पूर्व उपनगरे**
'एन' विभाग यांचे कार्यालय परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला,
पंत नगर बस डेपोच्या मागे घाटकोपर (पूर्व) मुंबई-400 074
**प्रथम अपीलिय अधिकारी व कार्यकारी अभियंता (प.ज.वा)**
पूर्व उपनगरे परि. 5 उप प्रमुख अभि. (पजवा) पू. उ. यांचे कार्यालय
परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर बस डेपोच्या मागे
घाटकोपर (पूर्व) मुंबई-400 074
**जन माहिती अधिकारी पदनिर्देशित अधिकारी 'मिठी' पऊ उ**
उप प्रमुख अभि. (प.ज.वा) पु उ यांचे कार्यालय परिवहन
यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर बस डेपोच्या मागे
घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०००७५.
**प्रथम अपीलिय अधिकारी व कार्यकारी अभियंता (पजवा) पू. उ.**
यांचे कार्यालय परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला,
पंत नगर बस डेपोच्या मागे घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०००७५.
**जन माहिती अधिकारी व सहाय्यक अभियंता (प. ज. वा.)**
पी/उत्तर उप. प्रमुख अभियंता (प. ज. वा.) प. उप. यांचे कार्यालय,
ग्रीनवूडस कॉ. ऑप. गृहनिर्माण संस्था, अंधेरी कुर्ला रोड, चकाला,
अंधेरी (पूर्व) मुंबई-400093

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (पजवा) पऊ**
(परि.४) उप प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) पश्चिम उपनगरे
यांचे कार्यालय ग्रीनवूडस कॉ. ऑप. गृहनिर्माण संस्था, अंधेरी कुर्ला रोड,
चकाला, अंधेरी (पूर्व) मुंबई-400093

**जन माहिती अधिकारी पदनिर्देशित अधिकारी 'मिठी' पऊ उ**
उप प्रमुख अभि. (प.ज.वा) पु उ यांचे कार्यालय परिवहन
यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर बस डेपोच्या मागे
घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०००७५

**प्रथम अपीलिय अधिकारी व कार्यकारी अभियंता (पजवा) पू. उ.**
यांचे कार्यालय परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर
बस डेपोच्या मागे घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०००७५

**जन माहिती अधिकारी पदनिर्देशित अधिकारी 'मिठी' पऊ उ**
उप प्रमुख अभि. (प.ज.वा) पु उ यांचे कार्यालय परिवहन
यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर बस डेपोच्या मागे
घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०००७५

**प्रथम अपीलिय अधिकारी व कार्यकारी अभियंता (पजवा) पू. उ.**
यांचे कार्यालय परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर
बस डेपोच्या मागे घाटकोपर (पूर्व) मुंबई-४०००७५

**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता (परि.) 'एल'**
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय 'एल' विभाग,
पहिला मजला, लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो. बर्वे मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई 400 070.

**प्रथम अपीलीय अधिकारी विभाग कार्यकारी अभियंता 'एल' विभाग**
बृहन्मुंबई महानगरपालिका कार्यालय 'एल' विभाग, पहिला मजला,
लक्ष्मणराव यादव मंडई इमारत, स.गो. बर्वे मार्ग,
कुर्ला (पश्चिम) मुंबई 400 070.

**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता (रस्ते) पूर्व उपनगरे**
'एन' विभाग यांचे कार्यालय परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला,
पंत नगर बस डेपोच्या मागे घाटकोपर (पूर्व) मुंबई-400 074

**प्रथम अपीलिय अधिकारी व कार्यकारी अभियंता (प.ज.वा)**
पूर्व उपनगरे परि. 5 उप प्रमुख अभि. (पजवा) पू. उ. यांचे कार्यालय
परिवहन यानगृह इमारत 5 वा मजला, पंत नगर बस डेपोच्या मागे
घाटकोपर (पूर्व) मुंबई-400 074

**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता बी विभाग**
यांचे कार्यालय महापालिका इमारत १२१ रामचंद्र भटू मार्ग
बाबुला टँक क्रॉस लेन मुंबई-४००००९

**प्रथम अपीलिय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बी विभाग**
यांचे कार्यालय महापालिका इमारत १२१ रामचंद्र भटू मार्ग
बाबुला टँक क्रॉस लेन मुंबई-४००००९

**जन माहिती अधिकारी सहा. अभियंता एम- पश्चिम विभाग**
यांचे कार्यालय पहिला मजला शरद भाऊ आचार्य मार्ग
चेंबूर मुंबई-४०००७१

**प्रथम आपले अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता**

एम- पश्चिम विभाग यांचे कार्यालय पहिला मजला

शरद भाऊ आचार्य मार्ग चेंबूर मुंबई-४०००७१

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.०७.२०२६**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | उपस्थित |
| विद्यमान जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपीलीय अधिकारी | : | उपस्थित |

आज सुनावणीच्या वेळी अपीलार्थी व विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) बांधकामे शहर, श्री. उमेश चव्हाण, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (जलकामे) बांधकामे शहर, श्री. विवेक पवार, श्री. नमोद रामदेके, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) एस विभाग, शरदकुमार विसपुते, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (प.ज.वा.) एल विभाग, श्री. सचिन घुगे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (रस्ते) पू.उ. श्रीमती मनिषा पावरा, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (रस्ते) शहर बी विभाग, श्री. प्रविण गायकवाड, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) ई विभाग, श्री. अविनाश पंडगे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) बी विभाग, श्री. शरद घुलवळे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (रस्ते) जी/उत्तर विभाग, श्री. प्रेमनाथ फालक, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) बी विभाग, श्री. रुपेश भंडागे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा दुय्यम अभियंता (पजवा) शहर पू.उ. श्री. विनायक इंगळे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (पजवा) पी/उत्तर, श्री. प्रविण पाडघरे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) एफ/उत्तर विभाग, श्री. किरण बडगुजर, श्री. संदिप मोरे, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.) आर/दक्षिण विभाग, श्री. रितेश भडणे प्रत्यक्ष उपस्थित आहेत. तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.१) आर/मध्य विभाग, श्री. पद्माकर चव्हाण, विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (परि.२) आर/मध्य विभाग, श्री. महेंद्र मोहिते दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहेत.

अपीलार्थी यांनी दाखल केलेल्या १०२ द्वितीय अपील अर्जांमध्ये अपीलार्थी, विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी प्रत्यक्ष व दृकश्राव्य माध्यमाद्वारे उपस्थित आहेत. यातील माहितीचा कालावधी साधारण सन २०२० ते २०२४ या कालावधीतील असून बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध विभाग विविध प्राधिकरण यांच्याकडून महानगरपालिकेच्या वतीने हाती घेण्यात आलेल्या अनेक

विकास कामे रस्ते दुरुस्ती, खडे दुरुस्ती, नाला सफाई, देखरेख, देखभाल, नुतनीकरण, रुंदीकरण इ. बाबतीत राबविण्यात आलेल्या निर्णय प्रक्रिया विविध कंत्राटदारांना देण्यात आलेली कंत्राट कामे त्यांनी केलेली कामकाज यावर करण्यात आलेली देखभाल गुणवत्ता तपासणी झालेला विनीयोग केलेल्या कामाचा दर्जा तसेच दोषदायित्व कालावधी (Defect Liability) निकृष्ट कामकाज केलेले कंत्राटदारांना करण्यात आलेली अथवा प्रस्तावित केलेली कार्यवाही यासंदर्भात साधारणपणे या सर्व बाबी माहिती अर्जात मागितल्या असून आयोगाच्या वतीने सन २०२२ साली घेण्यात आलेल्या विशेष मोहिम अंतर्गत मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्राधिकरणांनी यावर बऱ्याच प्रक्रिया या आधीच अपीलार्थी यांना माहिती प्रदान केली असून अशा स्वरुपाची लेखी नोंद देखील अपीलार्थी यांच्या वतीने संबंधित जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या कार्यालयात या आधीच देण्यात आली असून केवळ काही प्रकरणांमुळे यात अपीलार्थी यांनी शुल्क भरल्यानंतर ही विहीत कालावधीत माहिती देण्यात आली नसल्याचे असे नमूद केले आहे. तर काही प्रकरणांत माहिती प्राप्त झाली नाही तसेच चलन शुल्क भरण्याविषयी जन माहिती अधिकारी यांनी प्रतीसाद दिला नसल्याचा अपीलार्थी यांनी त्यांच्या मौखिक युक्तीवादातून स्पष्ट केले आहे.

**मा. सर्वोच्च न्यायालयाने Kisan Chand Jain Vs. Union of India मुळ याचिका (सिव्हील) क्र. ९९०/२०२१, या प्रकरणात दि. १७ ऑगस्ट, २०२३** रोजी दिलेल्या निर्णयानुसार **कलम** ४ अन्वये सर्व सार्वजनिक प्राधिकरणाने त्यांच्या कार्यालयातील अधिकाअधिक माहिती ही स्वंयप्रेरणेने उघड करण्याबाबत सुचीत केले आहे. तसेच **कलम ४ (१) (ख)** विशेष: त्यातील **कलम ४ (१) (११)** यात सर्व योजनेचे तपशिल प्रस्तावित खर्च दर्शविणारा आपल्या प्रत्येक प्राधिकरणाने नेमणूक दिलेला अर्थसंकल्प आणि सौवितरीत केलेल्या रक्कमेंचा अहवालाची माहिती संकेतस्थळावर वारंवार अद्यावत करण्याबाबत कायदेशीर बंधनकारक आहे. तसेच **कलम ४ (१) (ग) व (ख)** नुसार यात देखील ज्यामुळे लोकांना बाधा पोचण्याची महत्तवाचे धोरणे आखताना असे निर्णय जारी करतांना सर्व वस्तुस्थिती प्रसिध्द करीत **कलम ४ (१) (ख)** नुसार प्रशासकीय / न्यायिक बाधित व्यक्तिीना कळविणे अशी स्पष्ट तरतूद कायदेत असून **कलम ४ (२)** यात माहिती मिळविण्यासाठी लोकांना अधिनियमाचा कमीकमीत आधार घ्यावा लागावा यासाठी नियमित कालांतराने लोकांना इंटरनेटसह, संपर्कच्या विविध साधनांद्वारे,स्वता:हून माहिती पुरविण्यासाठी **पोटकलम (१) च्या खंड (ख)** च्या आवश्यक्ते नुसार उपाययोजना करण्याकरिता प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरण सतत प्रयत्नशिल राहील. तसेच **कलम ४ (१) (३)** च्या प्रयोजनांसाठी प्रत्येक माहिती विस्तृत प्रमाणात आणि लोकांना सहजपणे उपलब्ध होईल आणि अशा स्वरूपात आणि अशा रीतीने प्रसारित करण्यात येईल. **कलम ४ (४)** यातील तरतुदीनुसार पुरेपूर मोबदला देणारा खर्च, स्थानिक भाषा आणि त्या स्थानिक भागातील संपर्काची सर्वांत प्रभावी पद्धती या बाबी विचारात घेऊन सर्व

माहिती प्रसारित करण्यात येईल, आणि यथास्थिती केंद्रीय जन माहिती अधिकारी किंवा राज्य जन माहिती अधिकारी यांच्याकडे शक्यतो इलेक्ट्रॉनिक स्वरूपात ती माहिती मोफत किंवा विहित करण्यात येईल इतक्या माध्यमाच्या खर्चाएवढ्या किंवा मुद्रणाच्या खर्चाएवढ्या किमतीला सहजपणे उपलब्ध असावी.

वरील कागदपत्रांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत मा. सर्वोच्च न्यायालय यांच्या उपरोक्त आदेशान्वये या आधीच स्वयंस्पष्ट सूचना दिल्या असून अपीलार्थी यांनी मागितलेली माहिती ही व्यापक व विस्तृत स्वरुपाची असून यातील बरीचशी माहिती प्राधिकरणांनी या आधीच संकेतस्थळावर उपलब्ध करुन दिली असल्याचे प्रांजलपणे नमूद केले असले तरी अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावरुन प्राप्त करुन घेणे व्यवहाररित्या अशक्य व सामान्य माणसांना सुलभतेपणे आवश्यक्ती माहिती शोधून काढणे अवघड होऊन जाते. ज्या प्रकरणी त्यांनी शुल्क भरले आहे, अशा प्रकरणांची माहिती शक्यतो दस्तऐवज स्वरुपात प्रदान करण्यात येईल, असे नमूद केले आहे.

प्रस्तुत प्रकरणी कलम ४ १ (ख) यातील सर्व तरतुदींचा अवलोकन केल्यानंतर **मा. सर्वोच्च न्यायालयाने Kisan Chand Jain Vs. Union of India** या प्रकरणात दिलेल्या दिशा निर्देशाप्रमाणे तसेच **मा. राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी दि. २९.०४.२०२५ रोजी जारी केलेल्या निर्देश प्रमाणे** यातील ज्या प्रकरणात माहिती प्रदान करण्यात आलेली नाही. मात्र शुल्क भरलेले आहेत अशा प्रकरणात अपीलार्थी यांनी भरलेल्या शुल्काप्रमाणे कार्यालयीन अभिलेखात **कलम २ (च)** प्रमाणे उपलब्ध असलेली माहिती व जन माहिती अधिकारी यांनी सूचित केलेली सर्व माहिती प्रदान करण्यात यावी. उर्वरित प्रकरणांत अपीलार्थी यांचा द्वितीय अपील अर्ज मंजूर करीत उपलब्ध असलेली व देय असलेली व **कलम ४ (१) ख व (११)** याचा अंतरभाव असलेली सर्व माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संबंधित विभाग व उप विभाग यांनी त्यांच्या संकेतस्थळावर माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. उपरोक्त माहिती कशा प्रकारे प्राप्त करुन घ्यावी यासंदर्भातील मार्गदर्शन (Path) हे देखील स्वत:च्या संकेतस्थळावर प्रकट करावा. इतक्या मोठया प्रमाणावरील विस्तृत माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या तज्ञांनी जन माहिती अधिकारी यांना तांत्रिक सहाय्य प्रदान करणे आवश्यक असल्याने मा. महानगरपालिका आयुक्त यांना अशी सूचना देण्यात येते की, संबंधित अधिकारी यांना याबाबतीत योग्य ते दिशा निर्देश जाहिर करुन कालबध्द स्वरुपात व अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यासाठी कार्यवाही करुन योग्य त्या जवाबदार व ज्येष्ठ अधिकाऱ्यांमार्फत अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावर अद्यावत करुन सहज व सुलभरित्या उपलब्ध करुन दिली असल्याचा अनुपालन अहवाल आयोगास सादर करावा.

सर्व विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर माहिती पुढील १५ दिवसांच्या आत अपीलार्थीस उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या तज्ञांच्या तांत्रिक सहाय्य घेऊन बहुतांश माहिती ही कुठल्याही परिस्थितीत पुढील चार आठवडयाच्या आत महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करुन योग्य त्या जवाबदार वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत अशा प्रकारची माहिती संकेतस्थळावर अद्यावत करुन सहज व सुलभरित्या उपलब्ध करुन दिली असल्याचा अनुपालन अहवाल हा दि. १७.०८.२०२६ रोजी सादर करण्यात यावा.

तसेच अपीलार्थी यांनी अपील क्रमांक ६०२६,६०३४,६०४५ या प्रकरणांमध्ये शुल्क भरलेले आहेत, परंतु त्यांना माहिती प्रदान करण्यात आलेली नाही. सदर तिन्ही प्रकरणांतील प्राप्त केलेले सर्व शुल्क अपीलार्थीस उपरोक्त आदेश प्राप्त होताच बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लेखा व कोषागार विभागातून तात्काळ परत करण्यात यावे. वरील निर्देशासह उपरोक्त सर्व द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबंद करण्यात येत आहे.

**आदेश**

**१. वरील विवेचनानुसार जन माहिती अधिकारी यांनी कार्यवाही करावी.**
**२. वरील सर्व अपिले निकाली काढण्यात येत आहे.**

**स्वाक्षरीत/-**
**( राहुल भा. पांडे )**
**राज्य मुख्य माहिती आयुक्त**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : १४.०७.२०२६**

RAHUL BHALCHANDRA PANDE

Digitally signed by RAHUL BHALCHANDRA PANDE
DN: c=IN, 2.5.4.97=OFN:Maharashtra State Chief Information Commission Mumbai, o=Maharashtra State Chief Information Commission Mumbai, ou=State Information Commission, 2.5.4.20=211FC8BA99B710538561CE022F16DB877507502E9F09443B2466F775AF4FDB2A, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=1CEAB2634AF0275602A939C8218A713079109F9B806F4EF6C4B02C512873C5C2, cn=RAHUL BHALCHANDRA PANDE
Date: 2026.10.06 16:04:41 +05'30'